# महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित : औष्णिक विद्युत केंद्र, परळी-वैजनाथ


दुरध्वनी :- (०२४४६)२२२०२६(का)
पीबीएक्स:-२२२३५७ ते २२२३६०
फॅक्स :- (०२४४६) २२२४९२
ई-मेल :- cegenparli@mahagenco.in

MAHAGENCO
ISO 9001-2000
ISO 14001-2004

मुख्य अभियंता, यांचे कार्यालय,
औष्णिक विद्युत केंद्र,
परळी-वैजनाथ,
जिल्हा : बीड-४३१५२०.


जा.क्र.:मुअ/औ.वि.केंद्र/परळी-वै./मासं/सेप्र/आय.टी.आय.शि.ऊ./२०२६-२७/ No 03601 दिनांक: 26 MAY 2026

## परिपत्रक

**विषय:-** शिकाऊ उमेदवार कायदा १९६१(सुधारित १९७३ व १९८६) अनुसार आय.टी.आय. अर्हताधारक शिकाऊ उमेदवारांची २०२६-२०२७ सत्रात भरती करणेसाठी अधिसुचना.

**संदर्भ:-** १) म.रा.वि.मंडळाचे प्रशासकीय परिपत्रक क्र.४०१ दि.२३.१०.२००३.
२) म.रा.वि.नि.कंपनी मर्यादित प्रशासकीय परिपत्रक क्र.१९३ दि.२३.१२.२०११.
३) म.रा.वि.नि.कंपनी मर्यादित प्रशासकीय परिपत्रक क्र.२९२ दि.१०.०४.२०१५.
४) म.रा.वि.नि.कंपनी मर्यादित प्रशासकीय परिपत्रक क्र.३७१ दि.१४.०३.२०१७.

---

१) औष्णिक विद्युत केंद्र, परळी -वै. येथे शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ अंतर्गत सन २०२६-२०२७ या सत्रामध्ये व्यवसाय शिकाऊ उमेदवार (Trade Apprentice) प्रशिक्षणार्थ्यांची भरती करावयाची आहे.

२) सदर भरती करिता उमेदवार सुचना मधील क्र.४ अनुसार संबंधित व्यवसाय शाखेसमोर दर्शविल्याप्रमाणे अर्हताधारक असावा. ही अर्हता महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळांनी दिलेली असावी किंवा केंद्र सरकार अथवा राज्य सरकारच्या संबंधित खात्याची मान्यता प्राप्त असलेल्या संस्थेने दिलेली असावी. खुल्या प्रवर्गातील उमेदवारास किमान ६०% गुण व मागासप्रवर्गातील उमेदवारास किमान ५५% गुण प्राप्त करून उत्तीर्ण झालेले उमेदवार अर्ज करण्यास पात्र ठरतील.
तसेच, त्यांना आय.टी.आय. परीक्षा उत्तीर्ण होऊन तीन (३) वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी झालेला नाही आणि एक वर्ष किंवा त्यापेक्षा जास्त कालावधीचे प्रशिक्षण अथवा कामाचा अनुभव नसावे.

३) सदर इच्छूक उमेदवारांनी http://apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर स्वत: नोंदणी करून profile 100% अद्यावत करून संकेतस्थळावर आस्थापना कोड क्र.E01172700117 MAHAGENCO TPS Parli Vaijnath येथे online apply करणे आवश्यक आहे. आपले Profile 100% भरून व eKYC पूर्ण करून Profile ची प्रिंट, अर्ज व आवश्यक कागदपत्रे दि.०१.०६.२०२६ ते १०.०६.२०२६ पर्यंत परळी औ.वि.केंद्र येथील मुख्य अभियंता यांच्या कार्यालयात आवक विभागात Hard Copy दाखल करावे. जेणेकरून या कार्यालयास पुढील कार्यवाही त्वरीत करणे सोयीचे होईल.

४) प्रशासकीय परिपत्रक क्र.२९२ दि.१०.०४.२०१५ नुसार प्रकल्पग्रस्त उमेदवार यांना २५ % स्थानिक उमेदवार (प्रकल्प परिसरातील बाधित गावातील) व महानिर्मिती कंपनीच्या कर्मचा-यांचे पाल्य २५ % राखीव जागा राहतील.

अ) उर्वरित ५०% ह्या प्राप्त झालेल्या अर्जापैकी महानिर्मिती कंपनीचे प्रशासकीय परिपत्रक क्र.१९३ दि.२३.१२.२०११ अन्वये उमेदवारांनी व्यवसाय परीक्षेत मिळालेल्या आय.टी.आय. All semester मार्क (Aggregate) गुणांच्या आधारे गुणवत्ता यादी (मेरीट) तयार करून केवळ गुणवत्तेच्या निकषावर भरण्यात येईल.

**विशेष टिप्पणी:-**

(महानिर्मिती कंपनीच्या कार्यरत कर्मचा-याचे आयटीआय अर्हताधारक पाल्य व स्थानिक प्रकल्पग्रस्त उमेदवार (प्रकल्प परिसरातील बाधित गावातील) यांच्या करिता राखीव असलेल्या उपरोक्त नमूद कोट्यामध्ये जर उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर कोट्यातील रिक्त जागा उर्वरित ५० % कोट्या अंतर्गत गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.

ब) औ.वि.केंद्र, परळी येथील कर्मचा-यांना सूचित करण्यात येते की, महानिर्मिती कंपनी मध्ये कार्यरत कर्मचा-यांच्या आय.टी.आय. अर्हता धारक पाल्याकरिता राखीव असलेल्या २५ % कोट्यामध्ये **महानिर्मिती कंपनी मध्ये सध्या कार्यरत असलेल्या कर्मचा-यांचे स्वत:चे पाल्यांचेच अर्ज विचारात घेण्यात येतील. सदर कोट्यामध्ये कर्मचा-यांच्या इतर कोणत्याही नातेवाईकांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.** तसेच कर्मचारी यांच्या पाल्यांच्या अर्जासोबत महानिर्मिती कंपनीच्या ओळखपत्राची छायांकित प्रत जोडणे बंधनकारक राहील.

क) स्थानिक उमेदवार(प्रकल्प परिसरातील बाधित गावातील रहिवासी) यांना एकूण २५ % जागा राखीव ठेवण्यात

आलेल्या आहेत. सदर कोट्यातुन अर्ज करताना परळी वैजनाथ औष्णिक विद्युत केंद्र प्रकल्पामुळे बाधित गावातील रहिवासी असल्याबाबत तहसील कार्यालयामधून जारी केलेले रहिवाशी प्रमाणपत्र (साक्षांकित प्रत) जोडणे आवश्यक आहे.

(प्रकल्पग्रस्त परिसरातील गावांची नावे-परळी-वै. दाऊतपुर, संगम, जलालपुर, वडगाव दादाहरी, तळेगाव, डाबी, इंडपवाडी, ब्रम्हवाडी, टोकवाडी, धारासुर, खडका, नागापूर, लोणी, सेलु, भिसेगाव, आवलगाव, नैकोटा, वाडी नैकोटा)

५) शिकाऊ उमेदवार अधिनियम १९६१ नुसार उमेदवारांची वयोमर्यादा दि.०१.०६.२०२६ रोजी किमान १८ व कमाल ३८ असणे आवश्यक आहे. तसेच मागासवर्गीयांसाठी (५) वर्ष वयोमर्यादा शिथिल केली आहे.

६) सदर भरती प्रक्रियेकरिता आय.टी.आय. शिकाऊ उमेदवारांची निवड करण्याचे सर्वस्वी अधिकार सक्षम प्राधिकारी व औ.वि.केंद्र, परळी प्रशासन यांना असल्याने त्यांच्या मंजूरीनुसार निवड झालेल्या आय.टी.आय. अर्हताधारक शिकाऊ उमेदवारांचे सन-२०२६-२०२७ या कालावधीत पार पाडण्यात येईल याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**उमेदवारांना महत्वाच्या सुचना:-**

१) सोबत अर्जाचा नमुना जोडण्यात येत असून सदर अर्ज परिपूर्ण व अचूक भरलेला असणे आवश्यक आहे. अपूर्ण/चुकीचा भरलेला अथवा आवश्यक कागदपत्रे न जोडलेल्या अर्ज विचारात घेतला जाणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी. तसेच अपूर्ण/चुकीच्या अर्जाबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

२) उमेदवाराने अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाइल नंबर व ई-मेल आय.डी. नोंदणी करतेवेळी काळजीपूर्वक भरावा. उमेदवारांनी त्यांचा मोबाइल नंबर व ई-मेल आय.डी. भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वापरात ठेवणे ही सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी आहे. उमेदवाराचा मोबाइल नंबर व ई-मेल आय.डी. बंद झाल्यास अथवा बदलला गेल्यास उमेदवारास मेल अथवा संदेश प्राप्त न झाल्यास महानिर्मिती कंपनी जबाबदार राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३) http://apprenticeshipindia.org या संकेतस्थळावर Online नोंदणीची संपूर्ण जबाबदारी स्वत: उमेदवाराची राहील. या कार्यालयास Online Contract Registration प्रक्रिया करताना उमेदवारच्या प्रोफाइल मध्ये काही अडचणी आल्यास सदर उमेदवाराची नियुक्ति त्या क्षणी रद्द करण्यात येईल.

४)

| अ.क्र. | व्यवसाय शाखा | प्रशिक्षणाचा कालावधी | भरती करावयाची उमेदवार संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | वीजतंत्री (इलेक्ट्रिशियन) | एक वर्ष | ४० | आय.टी.आय. इलेक्ट्रिशियन परीक्षा पास |
| २ | तारतंत्री (वायरमन) | एक वर्ष | ३५ | आय.टी.आय. वायरमन परीक्षा पास |
| ३ | संधाता (वेल्डर) | एक वर्ष | ३० | आय.टी.आय. वेल्डर परीक्षा पास |
| ४ | पत्रेकारागीर | एक वर्ष | ०६ | आय.टी.आय. पत्रेकारागीर परीक्षा पास |
| ५ | कम्प्युटर ऑपरेटर | एक वर्ष | ०७ | आय.टी.आय. कम्प्युटर ऑपरेटर परीक्षा पास |
| | एकूण | | ११८ | |

या ट्रेडचे उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. याची कृपया सर्व इच्छुक उमेदवारांनी नोंद घ्यावी.

५) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असावा. तसेच उमेदवारजवळ महाराष्ट्र राज्याचा अधिवासी असल्याबाबतचे स्वत:च्या नावे असलेले अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध असणे आवश्यक आहे.

६) एकूण गुण सम-समान असतील तर सदर उमेदवारांची जन्मतारीख विचारात घेवून त्यांच्यातील जेष्ठताक्रम ठरविण्यात येईल.

७) उमेदवाराने भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर राजकीय तसेच अन्य कोणत्याही प्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे आढळल्यास किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती दिल्याचे प्रमाणपत्रे/कागदपत्रे किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची/तिची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

८) आय.टी.आय. अर्हताधारक सर्व पात्र उमेदवारांनी त्यांचे ऑनलाइन केलेले प्रपत्र सोबत जोडण्यात आलेल्या नमूना अर्ज यथोचित भरून औ.वि.केंद्र, परळी-वै. या कार्यालयातील मानव संसाधन विभागात दि.१०.०६.२०२६ पूर्वी सर्व

आवश्यक कागदपत्रासह सादर करणे आवश्यक आहे. दि.१०.०६.२०२६ नंतर सादर केलेले अर्ज तसेच आवश्यक कागदपत्र न जोडलेले अर्ज कुठल्याही सबबीखाली विचारात घेतले जाणार नाहीत.

९) सदर भरती प्रक्रियेमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण भरती रद्द करण्याचे अधिकार औ.वि.केंद्र, परळी प्रशासन राखून ठेवत आहे. सदर प्रकरणी कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

१०) शिकाऊ उमेदवारी भरती **बीड जिल्ह्यातील** पात्र उमेदवारांकरिता राबविण्यात येत आहे.

**सोबत:-** अर्जाचा नमुना

**मुख्य अभियंता**
महानिर्मिती, औ.वि.केंद्र, परळी-वै.

**प्रत- अंशकालीन प्राचार्य, महाराष्ट्र शासन मूलभूत प्रशिक्षण तथा अनुषांगिक सुचना केंद्र द्वारा औ.प्र. संस्था. बीड.**

**(टीप- सदर परिपत्रक आपल्या स्तरावर बीड जिल्ह्यामधील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रसारित करण्यात यावे. तसेच शिकाऊ उमेदवार यांना वरील प्रमाणे online अर्ज विहित मुदतीत सादर करणे बाबत. तसेच online भरलेला अर्ज आवश्यक ती कागदपत्रे सोबत जोडणे बाबत अवगत करण्यात यावे.)**

प्रत,
सर्व सुचना फलक , औ.वि.केंद्र, परळी-वै.